**नियमित दिवाणी दावा १९/२०२६**
**हिंदुराव जोती जांभळे**
**वि.**
**आनंदा जोती जांभळे**

# नि. IA २/२०२६ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेकरिता तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे प्रतिवादी क्र. ४ ते ९ यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन सदरच्या अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे.

३. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादी विरुद्ध कायम मनाई होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर कामी प्रतिवादी यांनी हजर होवून असे कथन केले की, वादींनी योग्य त्या प्रकारचा दावा न करता केवळ कायम मनाई ताकीदीचा दावा केला आहे, तो कायद्याने चालण्यास पात्र नाही, वादी यांनी वाटपाची दाद मागणी केलेली नाही, कायद्यातील तरतुदीनुसार वादीस निव्वळ मनाई करिता दावा दाखल करता येणार नाही, त्यामुळे वादीचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज चालणेस पात्र नाही, तसेच दाव्याचा तपशील व आकारणी चुकीची आहे. त्यामुळे सदर कामी दावा व तुर्तातुर्त मनाई अर्जाची निर्गत करतेवेळेस कायद्याने कोणतीही त्रुटी राहू नये व प्रतिवादीच्या कथनांचा पुनरुच्चार न होता रितसर निर्गत होण्यासाठी वादींना दाव्यात दुरुस्ती करणे भाग पडले आहे. तसेच दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ नंतर कायदेशीर सह हिस्सेदार यांना दाव्यात प्रतिवादी क्र. ४ ते ९ समाविष्ट करणे गरजेचे आहे. तसेच सदरची दुरुस्ती ही वादी यांना प्रतिवादी यांनी वादीने दाव्यात वाटपाची मागणी केली नाही असा मुद्दा उपस्थित केल्यामुळे करावी लागत आहे. तसेच सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. उलट न्यायदानास मदत होणार आहे व सत्य वस्तुस्थिती कोर्टासमोर येणार आहे. तसेच सदरची

दुरुस्ती ही कायद्याने अभिप्रेत आहे. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी १ व २ तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी दिलेला दावा दुरुस्ती अर्ज पूर्णपणे चुकीचा आहे. वादी यांनी दाखल केलेला दावा हा कायम मनाईसाठीचा आहे. यामध्ये तुर्तातुर्त मनाई अर्जावरती युक्तीवाद झालेला आहे व सदर अर्ज आदेशाकरिता ठेवलेला आहे. अशी परिस्थिती असताना वादींनी मागणी केलेली वाटपाची मागणी चुकीची आहे. वादीनी मागणी केलेल्या दुरुस्तीमुळे मूळ दावा व त्यामधील मागणी यामध्ये बदल होणार आहे. वादीने मागणी केलेली दुरुस्ती ही कायद्याने चालण्यास पात्र नाही. वादी यांनी निव्वळ त्रास देण्यासाठी दुरुस्ती अर्ज दाखल केलेला आहे. तसेच नि. ५ चा युक्तीवाद केल्यानंतर वादी यांनी मागणी केलेली दुरुस्ती चालण्यास पात्र नाही. तसेच वादी यांनी पूर्ण दाव्यात दुरुस्ती मागणी केलेली आहे त्यामुळे तशी दुरुस्ती करता येणार नाही. अंतिमतः प्रतिवादी १ व २ तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

५. प्रतिवादी क्र. ३ तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी दावा दुरुस्ती अर्ज व त्यामध्ये सुचविलेली दावा दुरुस्ती खरी व प्रामाणिकपणाची मुळीच नाही. तसेच सदर कामी मनाई अर्जाची चौकशी पूर्ण झाली असून दावा तुर्तातुर्त मनाई अर्जाचे निकालावर असताना वादींनी दावा दुरुस्ती अर्ज केला आहे. तसेच प्रथम मनाई अर्जाचा निर्णय केला जाणे योग्य व कायदेशीर होणार आहे. तसेच प्रतिवादी यांना नाहक गुंतागुंत निर्माण करण्यासाठी प्रस्तुत अर्ज वादींनी दाखल केलेला आहे. तसेच वादी यांनी दाखल केलेला अर्ज पश्चात बुद्धीचा आहे. तसेच वादींनी प्रतिवादी क्र. ४ ते ९ यांची नावे दाव्यात सामील करण्याची मागणी केली आहे त्याबाबत दुरूस्तीमध्ये कारण नमूद नाही. तसेच वादी यांनी दाव्याच्या टायटलमध्ये तसेच दावा कलम २, ३, ६-अ, ७, ९, १२, १६(ब) तसेच दावा कलम १६(ब१) मध्ये मागितलेली दुरुस्ती ही प्रतिवादी यांना मान्य नाही. अंतिमतः प्रतिवादी ३ तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

६. वादी यांचा अर्ज, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

७. कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादीचा दावा हा कायम मनाईसाठी करण्यात आलेला आहे. मात्र सदर कामी दाव्यात अद्याप पुरावा सुरु झालेला नाही. त्यामुळे कायद्यानुसार वादी यांना दुरुस्ती मागण्याचा पुर्ण अधिकार आहे असे वाटते. मात्र त्याच वेळी वादी मागत असलेली दुरुस्ती पाहता त्याबाबत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना स्पष्टीकरण देण्याचा पुर्ण अधिकार आहे असेही वाटते. मात्र सदर कामी झालेला विलंब दुर्लक्ष करता येणारा नाही. त्यामुळे वादी यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१. वादी यांचा नि. IA २/२०२६ वरील अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी रक्कम रु. ५०/- देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.**

**२. वादी यांनी दाव्यात दुरुस्ती १४ दिवसात करुन तात्काळ दुरुस्ती प्रत दाखल करावी.**

17/3/26

पन्हाळा
दि.१७.०३.२०२६

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.